# - प्रेस नोट -

दि. ०१/१०/२०२६

## आर.सी.एफ. पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.२९/०९/२०२६ रोजी २१.४५ वाजताच्या सुमारास फिर्यादी मुजम्मिल बाबुदिन शहा, वय-२८ वर्षे, धंदा- चालक, रा.ठी. मदिना मंजिल, विष्णूनगर, चेंबूर, मुंबई यांचा भाऊ मुजाहीद उर्फ साहील यांचा फोन अटक आरोपी पुरूष वय- २३ वर्षे यांचे कडुन तुटला असल्याने त्याची भरपाई मागण्यासाठी ते विष्णुनगर म्हाडा बिल्डींग नं.१ व २ च्या मधील मोकळी जागा, चेंबूर मुंबई येथे अटक आरोपीच्या आईशी बोलणे चालु असताना अटक आरोपी हा तेथे हातात लोखंडी रॉड घेऊन आला व शिवीगाळी करीत त्याने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डाव्या कानाच्यावर फटका मारला व फिर्यादींचा भाऊ यांच्या डाव्या डोळयाच्यावर डोक्यात लोखंडी रॉडने फटका मारून जखमी केले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. ३०/०९/२०२६ रोजी गु.र.क्र.६१२/२६, कलम १०९(१),३५२ बीएनएस २०२३ सह ३७(१), १३५, १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------